**L. A. BILL No. XXIV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २० जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ४३ **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, हे कलम तात्काळ अंमलात येईल, आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदींमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात आल्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम १० मध्ये,— (२०१७ चा महा. ४३.)

(क) पोट-कलम (२) मधील, खंड (घ) मध्ये, "वस्तुंचा किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२क) मधील, खंड (ग) मधील, "वस्तुंचा किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, पोट-कलम (२) मधील,—

(एक) दुसऱ्या परंतुकामधील, "त्याच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये त्यावरील व्याजासह विहित करण्यात येईल अशा रीतीने जमा करण्यात येईल" या मजकुराऐवजी, "कलम ५० अन्वये प्रदेय असलेल्या व्याजासह, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याच्याकडून प्रदान करण्यात येईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) तिसऱ्या परंतुकामधील, "त्यावरील देय असलेल्या व्याजासह" या मजकुरानंतर, "पुरवठादाराला" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १७ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मधील, स्पष्टीकरणामध्ये, " या शब्दप्रयोगात, अनुसूची तीनच्या ५ व्या परिच्छेदात विनिर्दिष्ट केलेले असतील ते व्यवहार खेरीज करून, त्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर व्यवहारांच्या किंवा संव्यवहारांच्या मूल्याचा समावेश होणार नाही." या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"या शब्दप्रयोगात, अनुसूची तीनच्या,—

(एक) परिच्छेद ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यवहारांचे किंवा संव्यवहारांचे मूल्य; आणि

(दोन) परिच्छेद ८ च्या खंड (क) च्या बाबतीत, विहित करण्यात येतील अशा व्यवहारांचे किंवा संव्यवहारांचे मूल्य,

खेरीज करून, उक्त अनुसूचीच्या परिच्छेद ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यवहारांच्या किंवा संव्यवहारांच्या मूल्याचा समावेश होणार नाही." हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (५) मधील, खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (चक) कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम १३५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या निगम सामाजिक जबाबदारी खालील करपात्र व्यक्तीच्या आबंधनांशी संबंधित असणाऱ्या व्यवहारांसाठी ज्या वापरल्या जात आहेत किंवा वापरण्याचे उद्देशित आहे अशा, तिला प्राप्त झालेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ;". (२०१३ चा १८.)

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, १ जुलै २०१७ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" (२) कलम २२ च्या पोट-कलम (१) मध्ये किंवा कलम २४ मध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, शासनास परिषदेच्या शिफारशींवरून, या अधिनियमान्वये ज्या व्यक्तींना नोंदणी करण्यामधून सूट देता येईल अशा व्यक्तींचा प्रवर्ग, अधिसूचनेद्वारे, तिच्यात, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधाना अधीन राहून, विनिर्दिष्ट करता येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(क) " त्याची नोंदणी रद्द केल्याचा आदेश बजाविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित रीतीने " या मजकुराऐवजी, " विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा मुदतीत आणि अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुक वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :-

" (५) नोंदणीकृत व्यक्तीला, जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या कर कालावधीसाठी पोट-कलम (१) अन्वये उक्त जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्याची मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त जावक पुरवठ्याचे तपशील सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, पोट-कलम (१) अन्वये अशा कर कालावधीच्या जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये, पोट-कलम (१०) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :-

" (११) विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, कर कालावधीचे उक्त विवरण सादर करण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तीला मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त कर कालावधीचे विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, अशा कर कालावधीचे विवरण सादर करण्यासाठी अशा नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ ला त्याचे, पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि, असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :-

" (२) नोंदणीकृत व्यक्तीला, वार्षिक विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, वित्तीय वर्षासाठी पोट-कलम (१) अन्वये असे वार्षिक विवरण सादर करण्यासाठी मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त वार्षिक विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, पोट-कलम (१) अन्वये अशा वित्तीय वर्षाचे वार्षिक विवरण सादर करण्यासाठी अशा नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये, पोट-कलम (१४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल:-

" (१५) प्रचालकाला, विवरणपत्र सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, पोट-कलम (४) अन्वये उक्त विवरणपत्र सादर करण्यासाठी मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त विवरणपत्र सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, पोट-कलम (४) अन्वये विवरणपत्र सादर करण्यासाठी प्रचालकाला किंवा प्रचालकांच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मधील, पोट-कलम (६) मधील, " तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आलेली निविष्टी कराची जमा रक्कम वगळून," हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मधील, "उक्त पोट-कलमान्वये अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या दिनांकापासून अशा कराच्या परताव्याच्या दिनांकापर्यंत," या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तीच्या व निर्बंधाच्या अधीन राहून, परिगणना करण्यात यावयाच्या, असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून अशा कराच्या परताव्याच्या दिनांकापर्यंत साठ दिवसांनंतरच्या विलंबाच्या कालावधीसाठी " मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मधील, पोट-कलम (२) मध्ये,—

(क) "तीस दिवसांच्या" या मजकुराऐवजी, "साठ दिवसांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जेव्हा नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (१) खालील निर्धारण आदेश बजावल्यापासून साठ दिवसांच्या आत वैध विवरण दाखल करण्यात कसूर करील त्याबाबतीत, ती व्यक्ती, उक्त निर्धारण आदेश बजावल्यापासून साठ दिवसांनंतरच्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये इतके अतिरिक्त विलंब शुल्क प्रदान केल्यावर, पुढील साठ दिवसांच्या कालावधीत ते सादर करू शकेल, आणि जर तिने अशा वाढीव कालावधीच्या आत वैध विवरण सादर केले तर, उक्त निर्धारण आदेश, मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल, परंतु कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये व्याज प्रदान करण्याचे किंवा कलम ४७ अन्वये विलंब शुल्क प्रदान करण्याचे दायित्व चालू राहिल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याचे कलम १०९ बदली दाखल करणे.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

अपील न्यायाधिकरण व त्यांची न्यायपीठे घटित करणे.

"**१०९.** या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीन राहून, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियनमान्वये घटित केलेले वस्तू व सेवा कर न्यायाधिकरण हे, या अधिनियमांन्वये अपील प्राधिकाऱ्याने किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशावरील अपिलांची सुनावणी करणारे अपील न्यायाधिकरण असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याची कलमे ११० व ११४ वगळणे.

**१५.** मुख्य अधिनियमाची कलमे ११० व ११४ वगळण्यात येतील.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११७ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११७ मध्ये,-

(क) पोट-कलम (१) मध्ये "राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी" या मजकूराऐवजी "राज्य न्यायपीठांनी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (५) मधील ,—

(१) खंड (क) मध्ये "राज्य न्यायपीठाने किंवा श्रेत्रीय न्यायपीठांनी" या मजकूराऐवजी "राज्य न्यायपीठांनी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) खंड (ख) मध्ये "राज्य न्यायपीठाकडून किंवा श्रेत्रीय न्यायपीठांकडून" या मजकूराऐवजी "राज्य न्यायपीठांकडून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (क) मध्ये, “राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी” या मजकुराऐवजी, “मुख्य न्यायपीठाने” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११८ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११९ मध्ये,-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११९ ची सुधारणा.

(क) “राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी” या मजकुराऐवजी, “मुख्य न्यायपीठाने” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) “राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी” या मजकुराऐवजी, “राज्य न्यायपीठांनी” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२२ मधील, पोट-कलम (१क) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १२२ ची सुधारणा.

“(१ख) जो कोणताही इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक,-

(एक) असा पुरवठा करण्यासाठी या अधिनियमान्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे, नोंदणी करण्यातून सूट दिलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त, अन्य बिगर-नोंदणीकृत व्यक्तीला, त्याच्यामार्फत वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्यास मुभा देतो;

(दोन) जी व्यक्ती, असा आंतर-राज्यीय पुरवठा करण्यासाठी पात्र नाही अशा व्यक्तीला, त्याच्यामार्फत वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आंतर-राज्यीय पुरवठा करण्यास मुभा देतो; किंवा

(तीन) या अधिनियमान्वये नोंदणी करण्यातून सूट दिलेल्या व्यक्तीला, त्याच्यामार्फत केल्या जात असलेल्या कोणत्याही जावक वस्तुंच्या पुरवठ्याच्या कलम ५२ च्या पोट-कलम (४) अन्वये सादर करावयाच्या विवरणपत्रामध्ये, योग्य तपशील सादर करण्यात कसूर करतो,

असा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक, दहा हजार रुपये किंवा कलम १० अन्वये कर प्रदान करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य नोंदणीकृत व्यक्तीने असा पुरवठा केला असता तर, जो अंतर्भूत झाला असता त्या कराच्या रकमे इतकी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल तितकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.”.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३२ मध्ये, पोट-कलम (१) मधील,-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३२ ची सुधारणा.

(क) खंड (छ), (ञ) व (ट) वगळण्यात येतील;

(ख) खंड (ठ) मधील, “खंड (क) ते (ट)” या मजकुराऐवजी, “खंड (क) ते (च) आणि खंड (ज) व (झ)” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ग) खंड (तीन) मधील, “अशा प्रकरणांत, ” या मजकुराऐवजी, “खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाच्या प्रकरणांत,” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(घ) खंड (चार) मधील, “किंवा खंड (छ) किंवा खंड (ञ)” हा मजकूर वगळण्यात येईल.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३८ मध्ये,-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३८ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकामध्ये,-

(एक) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

“(क) ज्या व्यक्तीस, कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) ते (च), (ज), (झ) व (ठ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांपैकी कोणत्याही अपराधांच्या बाबतीत, अपराधांची आपसमेळ करण्याची एकदा मुभा देण्यात आली आहे अशी व्यक्ती;”;

(दोन) खंड (ख) वगळण्यात येईल;

(तीन) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

“(ग) जी व्यक्ती, कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख)

खालील, अपराध केल्याची आरोपी ठरली आहे अशी व्यक्ती;";

(चार) खंड (ङ) वगळण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२) मधील, "दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल किंवा अंतर्भूत कराच्या पन्नास टक्के, यांपैकी जी अधिक असेल ती, या किमान रकमेच्या आणि तीस हजारांपेक्षा कमी नसेल किंवा कराच्या दीडशे टक्के, यांपैकी जी अधिक असेल त्या कमाल रकमेस" या मजकुराऐवजी, "अंतर्भूत असलेल्या कराच्या पंचवीस टक्के या किमान रकमेच्या आणि अंतर्भूत असलेल्या कराच्या शंभर टक्क्यांपेक्षा अधिक नसेल त्या कमाल रकमेस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ मध्ये नवीन कलम १५८क समाविष्ट करणे.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः-

करपात्र व्यक्तीने सादर केलेली माहिती संमतीच्या आधारे उपलब्ध करून देणे.

"**१५८क.** (१) कलमे १३३, १५२ व १५८ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीने सादर केलेला पुढील तपशील, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, आणि परिषदेच्या शिफारशींवरून, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन राहून, शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येतील अशा इतर प्रणालींसह सामायिक पोर्टलद्वारे उपलब्ध करून देण्यात येईलः-

(क) कलम २५ अन्वये नोंदणीच्या अर्जात अथवा कलम ३९ किंवा कलम ४४ अन्वये दाखल केलेल्या विवरणात सादर केलेला तपशील;

(ख) बीजक तयार करण्यासाठी, सामायिक पोर्टलवर टाकलेला तपशील, कलम ३७ अन्वये सादर केलेल्या जावक पुरवठ्याचा तपशील आणि कलम ६८ अन्वये दस्तऐवजांच्या निर्मितीसाठी सामायिक पोर्टलवर टाकलेला तपशील;

(ग) विहित करण्यात येतील, असे इतर तपशील.

(२) पोट-कलम (१) अन्वये तपशील उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनार्थ-

(क) पोट-कलम (१) च्या खंड (क), (ख) व (ग) या अन्वये सादर केलेल्या तपशीलाच्या बाबतीत, पुरवठादाराची; आणि

(ख) पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये, आणि जेव्हा अशा तपशिलात, प्राप्तकर्त्याच्या ओळखीचा समावेश असेल तेव्हाच केवळ पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, सादर केलेल्या तपशीलाच्या बाबतीत प्राप्तकर्त्याची,

विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने संमती घेण्यात येईल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या परिणामी उद्भवलेल्या कोणत्याही दायित्वाच्या बाबतीत, शासनाविरुद्ध किंवा सामायिक पोर्टलविरुद्ध कोणतीही कारवाई दाखल केली जाणार नाही आणि संबंधित पुरवठ्यावरून किंवा संबंधित विवरणानुसार कर प्रदान करण्याच्या दायित्वावर कोणताही परिणाम होणार नाही.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची तीन मधील विवक्षित व्यवहारांना व संव्यवहारांना भूतलक्षी प्रभावाने सूट देणे.

**२३.** (एक) मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-तीन मधील, परिच्छेद ७ व ८ आणि त्याचे स्पष्टीकरण २ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ याच्या कलम ३१ द्वारे समाविष्ट केल्याप्रमाणे), १ जुलै २०१७ पासून त्यात समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) जो कर वसूल करण्यात आलेला आहे परंतु, सर्व महत्त्वाच्या वेळी, पोट-कलम (१) अंमलात राहिले असते तर, जो अशा प्रकारे वसूल करता आला नसता, अशा सर्व कराचा परतावा देण्यात येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

वस्तू व सेवा कर कायद्यांमध्ये सुधारणा करण्यास सुचविणारे विविध निर्णय वस्तू व सेवा कर परिषदेकडून घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १२) आणि एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १३) यांमध्ये वित्त अधिनियम, २०२३ (२०२३ चा ८) याद्वारे संसदेकडून सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेमध्ये एकरूपता राखण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. उक्त अधिनियमामधील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:-

(एक) आपसमेळ कर आकारणी अंतर्गत कर प्रदान करण्याच्या विकल्पामधून, इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकामार्फत वस्तुंचा पुरवठा करण्यात सहभागी असलेल्या नोंदणीकृत व्यक्तींवर लादलेले निर्बंध काढून टाकण्यात यावे म्हणून, कलम १० मधील, पोट-कलम (२) च्या खंड (घ) आणि पोट-कलम (२क) च्या खंड (ग) मध्ये सुधारणा करणे.

(दोन) उक्त अधिनियमामध्ये तरतूद केलेले विवरण भरण्याच्या प्रणालीशी, उक्त पोट-कलम एकरुप करण्यासाठी कलम १६ मधील, पोट-कलम (२) मधील दुसऱ्या व तिसऱ्या परंतुकात सुधारणा करणे.

(तीन) कलम १७ मध्ये,-

(क) उक्त अधिनियमाच्या अनुसूची- तीनच्या परिच्छेद ८ च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित संव्यवहारांच्या बाबतीतील निविष्टी कराच्या जमा रकमेच्या उपलब्धतेवर निर्बंध घालता यावा म्हणून, पोट-कलम (३) मधील, स्पष्टीकरणामध्ये सुधारणा करणे.

(ख) कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) याच्या कलम १३५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या निगम सामाजिक जबाबदारीखालील करपात्र व्यक्तीच्या दायित्वाशी संबंधित असणाऱ्या व्यवहारांसाठी वापरण्यात येत असलेल्या किंवा वापरण्याचा इरादा असलेल्या तिच्याकडून प्राप्त झालेल्या वस्तुंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम उपलब्ध होणार नाही अशी तरतूद करता यावी म्हणून, पोट-कलम (५) मध्ये सुधारणा करणे.

(चार) कलम २२ च्या पोट-कलम (१) व कलम २४ वरील अधिभावी प्रभावाकरिता स्पष्टपणे तरतूद करण्यासाठी कलम २३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, १ जुलै २०१७ पासून भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करणे.

(पाच) तरतुदीमध्ये अधिक लवचिकता आणण्याच्या दृष्टीने, संबंधित नियमांद्वारे नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेण्याचा अर्ज दाखल करण्याची मुदत, रीत, शर्ती व निर्बंध विहित करण्यासाठी समर्थकारी तरतूद करता यावी म्हणून, कलम ३० मधील पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करणे.

(सहा) कर कालावधीसाठी ज्या कालमर्यादेपर्यंत कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये जावक पुरवठ्याचे तपशील, नोंदणीकृत व्यक्तीद्वारे सादर करता येऊ शकेल अशा तीन वर्षांच्या कालमर्यादेची तरतूद करता यावी म्हणून, उक्त कलमामध्ये, पोट-कलम (५) नव्याने समाविष्ट करणे.

(सात) कर कालावधीसाठी ज्या कालमर्यादेपर्यंत विवरण, नोंदणीकृत व्यक्तीद्वारे सादर करता येऊ शकेल अशा तीन वर्षांच्या कालमर्यादेची तरतूद करता यावी म्हणून, कलम ३९ मध्ये, पोट-कलम (११) नव्याने समाविष्ट करणे.

(आठ) वित्तीय वर्षासाठी ज्या कालमर्यादेपर्यंत कलम ४४ च्या पोट-कलम (१) अन्वये वार्षिक विवरण, नोंदणीकृत व्यक्तींद्वारे सादर करता येऊ शकेल अशा तीन वर्षांच्या कालमर्यादेची तरतूद करता यावी म्हणून, उक्त कलमामध्ये, पोट-कलम (२) नव्याने समाविष्ट करणे.

(नऊ) एका महिन्यासाठी, ज्या कालमर्यादेपर्यंत, कलम ५२ च्या पोट-कलम (४) अन्वये विवरण, इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाकडून सादर करता येऊ शकेल अशा तीन वर्षांच्या कालमर्यादेची तरतूद करता यावी म्हणून, उक्त कलमामध्ये, पोट-कलम (१५) नव्याने समाविष्ट करणे.

(दहा) तात्पुरत्या स्वरुपात स्वीकृत केलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा संदर्भ, उक्त अधिनियमाच्या कलम ४१ च्या पोट-कलम (१) नुसार स्वयंनिर्धारित निविष्टी कराच्या जमा रकमेच्या उपलब्धतेच्या विद्यमान योजनेशी एकरुप करता यावा म्हणून त्याचा संदर्भ काढून टाकण्यासाठी कलम ५४ मधील, पोट-कलम (६) ची सुधारणा करणे.

(अकरा) विलंबाने केलेल्या परताव्यांतील व्याजाच्या परिगणनेकरिता विलंबाच्या कालावधीची संगणना करण्याची रीत नियमांद्वारे तरतूद करता यावी म्हणून कलम ५६ ची सुधारणा करणे.

(बारा) कलम ६२ मध्ये,-

(क) पोट-कलम (१) अन्वये काढलेला निर्धारण आदेश मानीव स्वरुपात मागे घेणे शक्य व्हावे यासाठी नोंदणीकृत व्यक्तींद्वारे विवरण दाखल करण्यासाठी ३० दिवसांवरून ६० दिवसांपर्यंत मुदत वाढविण्यासाठी पोट-कलम (२) ची सुधारणा करणे.

(ख) उक्त कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये काढलेला निर्धारण आदेश मानीव स्वरुपात मागे घेणे शक्य व्हावे यासाठी या वाढविलेल्या कालावधीमध्ये अतिरिक्त विलंब शुल्क प्रदान करून, उक्त कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेली मुदत मर्यादा समाप्त झाल्यानंतर नोंदणीकृत व्यक्तीला तिचे विवरण दाखल करण्यासाठी ६० दिवसांच्या मुदत मर्यादेची तरतूद करण्यासाठी उक्त पोट-कलमात परंतुक समाविष्ट करणे.

(तेरा) अपील न्यायाधिकरण व त्याची न्यायपीठे घटित करण्याची तरतूद करण्यासाठी कलम १०९ बदली दाखल करणे.

(चौदा) कलमे ११० व ११४ वगळणे.

(पंधरा) "राष्ट्रीय व प्रादेशिक न्यायपीठे" या मजकुराऐवजी, "मुख्य न्यायपीठ" हा मजकूर आणि "राज्य व क्षेत्रीय न्यायपीठे" या मजकुराऐवजी, "राज्य न्यायपीठ" हा मजकूर दाखल करून या अधिनियमामधील नाम संज्ञा एकरुप करण्यासाठी कलमे ११७, ११८ व ११९ यांमध्ये सुधारणा करणे.

(सोळा) नोंदणीकृत नसणाऱ्या व्यक्तींनी किंवा आपसमेळ कर प्रदात्यांनी, त्यांच्या मार्फत केलेल्या वस्तुंच्या व सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असणाऱ्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास, इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकांना लागू असलेल्या दंडनीय तरतुदींची तरतूद करता यावी म्हणून नवीन कलम १२२ मध्ये नवीन पोट-कलम (१ख) समाविष्ट करणे.

(सतरा) कलम १३२ च्या पोट-कलमाच्या खंड (छ), (ञ) व (ट) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेले अपराध बिगर गुन्हेगारी कृत्य म्हणून समजण्यासाठी कलम १३२ मधील पोट-कलम (१) ची सुधारणा करणे.

(अठरा) कलम १३८ मध्ये,-

(क) उक्त अधिनियमाखालील अपराधांची आपसमेळ करण्याच्या विकल्पामधून वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा पुरवठा न करता, बीजके देण्याशी संबंधित असणाऱ्या अपराधांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींना वगळता यावे म्हणून पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात सुधारणा करणे;

(ख) आपसमेळाची किमान तसेच कमाल रक्कम कमी करून, विविध अपराधांची आपसमेळ करण्याच्या रकमेचे सुसूत्रीकरण करता यावे म्हणून, पोट-कलम (२) ची सुधारणा करणे.

(एकोणीस) नोंदणीकृत व्यक्तीने नोंदणी करण्यासाठी तिच्या अर्जामध्ये किंवा दाखल केलेल्या तिच्या विवरणामध्ये किंवा तिच्या जावक पुरवठ्यांच्या विवरणपत्रामध्ये, सादर केलेली माहिती किंवा इलेक्ट्रॉनिक बीजक

निर्माण करण्यासाठी तिने टाकलेले तपशील किंवा ई-वे बिल किंवा नियमांद्वारे तरतूद करण्यात येईल असा इतर कोणताही तपशील अधिसूचित करण्यात येतील अशा इतर प्रणालींसह सामायिक पोर्टलवर, उपलब्ध करून देण्याची रीत व शर्ती यांची तरतूद करता यावी म्हणून, नवीन कलम १५८क समाविष्ट करणे.

(वीस) अनुसूची-तीनचे परिच्छेद ७ व ८ आणि स्पष्टीकरण २, दिनांक १ जुलै २०१७ पासून भूतलक्षी प्रभावाने लागू करण्यासाठी अनुसूची तीनची सुधारणा करणे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १७ जुलै, २०२३.

**अजित पवार,**
उप मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (२).**— या खंडान्वये, अधिनियमाची उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात आणण्याचा आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५.**— महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम २३ च्या पोट-कलम (२) मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, उक्त अधिनियमान्वये नोंदणी करण्यामधून ज्यांना सूट देता येईल अशा व्यक्तींचा प्रवर्ग, अधिसूचनेद्वारे, तिच्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, निर्दिष्ट करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६.**— उक्त अधिनियमाच्या कलम ३० च्या पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, नोंदणी मागे घेण्याचा आदेश रद्द करण्याचा अर्ज करण्याची रीत, मुदत आणि शर्ती व निर्बंध यांची तरतूद करण्यासाठी नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७.**— उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील पोट-कलम (५) जादा दाखल करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, नोंदणीकृत व्यक्तींसाठी किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाकरिता, परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे, विवक्षित शर्तींना व निर्बंधाना अधीन राहून, मुदत मर्यादा वाढविण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८.**— उक्त अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये नवीन पोट-कलम (११) समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, नोंदणीकृत व्यक्तींसाठी किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाकरिता, परिषदेच्या शिफारशींवरुन, अधिसूचनेद्वारे, विवक्षित शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुदत मर्यादा वाढविण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ९.**— उक्त अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये नवीन पोट-कलम (२) समाविष्ट करण्याच्या हेतू असणाऱ्या या खंडान्वये, नोंदणीकृत व्यक्तींसाठी किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाकरिता, परिषदेच्या शिफारशींवरुन अधिसूचनेद्वारे, विवक्षित शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुदत मर्यादा वाढविण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०.**— उक्त अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये नवीन पोट-कलम (१५) समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, नोंदणीकृत व्यक्तींसाठी किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाकरिता, परिषदेच्या शिफारशीवरुन, अधिसूचनेद्वारे, विवक्षित शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुदत मर्यादा वाढविण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १२.**— उक्त अधिनियमाच्या कलम ५६ ची सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, विलंबाने केलेल्या परताव्यांवरील व्याजाची परिगणना करण्याकरिता विलंबाच्या कालावधीची संगणना करण्याची रीत, नियमांद्वारे तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २२.**— उक्त अधिनियमामध्ये नवीन कलम १५८क समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, नोंदणीकृत व्यक्तीने नोंदणीकरिता तिच्या अर्जामध्ये सादर केलेली माहिती किंवा दाखल केलेल्या तिच्या विवरणामध्ये किंवा तिच्या जावक पुरवठ्यांच्या विवरणपत्रामध्ये, किंवा इलेक्ट्रॉनिक बीजक निर्माण करण्यासाठी तिने टाकलेले तपशील किंवा ई-वे बिल किंवा इतर कोणतेही तपशील, अधिसूचित करण्यात येतील अशा इतर प्रणालींसह सामायिक पोर्टलवर, उपलब्ध करून देण्याची रीत व शर्ती यांची नियमांद्वारे तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकात, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४३) यात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

सदर विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीमधून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

(महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत )

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२३ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**सन २०२३ चे वि. स. विधेयक क्रमांक २४–महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**[महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०१७ यातील उतारे]**

**(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.)**

**१.** ते **९.** ** ** **

**१०.** (१) ** ** ** आपसमेळ कर आकारणी.

(२) नोंदणीकृत व्यक्ती जर,—

(क) ते (ग) ** ** **

(घ) कलम ५२ अन्वये ज्याच्याबाबत मूळ स्रोतातून कराची वसुली करण्याची आवश्यकता आहे अशा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकामार्फत वस्तूंचा किंवा सेवांचा कोणताही पुरवठा करणारी नसेल;

(ङ) ** ** **

(च) ** ** **

तर, ती व्यक्ती पोट-कलम (१) खालील पर्याय निवडण्यास पात्र असेल :

परंतु, एकाहून अधिक नोंदणीकृत व्यक्तींकडे (आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला) एकच स्थायी लेखा क्रमांक (पॅन) असेल त्याबाबतीत अशा सर्व नोंदणीकृत व्यक्तींनी पोट-कलम (१) अन्वये कर भरण्याच्या पर्यायाची निवड करीपर्यंत, अशी नोंदणीकृत व्यक्ती त्या पोट-कलमाखालील योजनेचा पर्याय निवडण्यास पात्र असणार नाही.

" (२क) या अधिनियमात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम ९ ची पोट-कलमे (३) व (४) यांच्या तरतुदींना अधीन राहून, जिची मागील वित्तीय वर्षातील एकूण उलाढाल, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक झालेली नसेल अशा, पोट-कलम (१) व पोट-कलम (२) अन्वये कर प्रदान करण्याच्या विकल्पास पात्र नसलेल्या कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीस, जर ती,–

(क) व (ख) ** ** **

(ग) ज्याने कलम ५२ अन्वये मूळ स्रोतातून कराची वसुली करण्याची आवश्यकता आहे अशा इलेक्ट्रॉनिक व्यापार प्रचालकामार्फत वस्तूंचा किंवा सेवांचा कोणताही पुरवठा करीत नसेल तर;

(घ) ते (ङ) ** ** **

परंतु, जेव्हा एकाहून अधिक नोंदणीकृत व्यक्तींकडे आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला एकच स्थायी लेखा क्रमांक असेल तेव्हा अशा बाबतीत, अशी नोंदणीकृत व्यक्ती, अशा सर्व नोंदणीकृत व्यक्तींनी या पोट-कलमाखाली कर प्रदान करण्याचा विकल्प निवडल्याशिवाय या पोट-कलमाखालील योजनेचा पर्याय निवडण्यास पात्र असणार नाही.

(३) ते (५) ** ** **

"**स्पष्टीकरण १.—** या कलमाखाली कर प्रदान करण्याची तिची पात्रता निश्चित करण्यासाठी एखाद्या व्यक्तीच्या एकूण उलाढालीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, "एकूण उलाढाल" या शब्दप्रयोगामध्ये, अशा व्यक्तीनं, एखाद्या वित्तीय वर्षाच्या १ एप्रिल पासून ते, या अधिनियमान्वये नोंदणी करण्यास ती जेव्हा पात्र ठरते त्या दिनांकापर्यंत केलेल्या पुरवठ्याच्या मूल्याचा समावेश होईल, परंतु, यात, जेथवर मोबदला, व्याजाच्या किंवा बट्ट्याच्या स्वरूपात दर्शविलेला असेल तेथवर, ठेवी, कर्जे किंवा अग्रिमे देण्याच्या मार्गाने पुरविलेल्या सेवांच्या करमाफ पुरवठ्याच्या मूल्याचा समावेश होणार नाही.

**स्पष्टीकरण २.—** या कलमान्वये एखाद्या व्यक्तीकडून प्रदेय असलेला कर निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, " राज्यातील उलाढाल" या शब्दप्रयोगामध्ये पुढील पुरवठ्यांच्या मूल्याचा समावेश होणार नाही :—

(एक) वित्तीय वर्षाच्या १ एप्रिल पासून ते, या अधिनियमान्वये नोंदणी करण्यास अशी व्यक्ती जेव्हा पात्र ठरते त्या दिनांकापर्यंतच्या पुरवठ्यांचा ; आणि

(दोन) जेथवर मोबदला, व्याजाच्या किंवा बट्ट्याच्या स्वरूपात दर्शविलेला असेल तेथवर, ठेवी, कर्जे किंवा अग्रिमे देण्याच्या मार्गाने पुरविलेल्या सेवांच्या करमाफ पुरवठ्याचा.".

**११.** ते **१५.** ** ** **

निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठीच्या पात्रता व शर्ती.

**१६.** (१) ** ** **

(२) या कलमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती,—

(क) या अधिनियमान्वये नोंदणीकृत असलेल्या पुरवठादाराने दिलेले कर बीजक, नावे पत्र किंवा विहित करण्यात येईल असे अन्य कोणतेही कर प्रदान दस्तऐवज तिच्या ताब्यात नसतील ;

"(कक) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बीजकाचं किंवा नावेपत्राचे तपशील, पुरवठादाराकडून जावक पुरवठ्याच्या विवरणपत्रामध्ये सादर करण्यात आला नसेल आणि असे तपशील कलम ३७ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने अशा बीजकाच्या किंवा नावंपत्राच्या प्राप्तकर्त्याला कळवण्यात आला नसेल.".

(ख) तिला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही प्राप्त झाल्या नसतील;

(खक) कलम ३८ अन्वये अशा नोंदणीकृत व्यक्तीला कळविलेल्या उक्ती पुरवठ्याच्या बाबतीत निविष्टी कराच्या जमा रकमेचे तपशील, निबंधित करण्यात आले असतील.

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ,

(एक) पुरवठादाराने वस्तूंची वाहतूक करण्यापूर्वी किंवा त्यांच्या वाहतुकीच्यावेळी एकतर त्या वस्तूंच्या मालकी हक्कासंबंधीच्या दस्तऐवजांचे हस्तांतरण करून किंवा अन्यथा, नोंदणीकृत व्यक्तीच्या—

मग ती अभिकर्ता म्हणून किंवा अन्य रीतीने कार्य करीत असो–निदेशावरून एखाद्या प्राप्तकर्त्याला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या वस्तूंची पोचवणी केली असेल त्याबाबतीत,

(दोन) पुरवठादाराने, नोंदणीकृत व्यक्तीच्या निर्देशावरून आणि तिच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला सेवा पुरविल्या असतील त्याबाबतीत,

अशा नोंदणीकृत व्यक्तीला त्या वस्तू किंवा यथास्थिति, सेवा प्राप्त झाल्या आहेत, असे मानण्यात येईल.

(ग) कलम ४१ च्या तरतुदींच्या अधीनतेने अशा पुरवठ्याच्या संदर्भात आकारण्यात आलेला कर शासनाच्या नावे रोखीच्या रूपात किंवा उक्त पुरवठ्याच्या संदर्भात अनुज्ञेय असलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे उपयोजन करून भरला नसेल; आणि

(घ) तिने कलम ३९ अन्वये विवरण सादर केले नसेल;

तर तिला पुरविलेल्या वस्तू किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या कोणत्याही पुरवठ्याबाबत कोणत्याही निविष्टीकराच्या जमा रकमेसाठी हक्कदार असणार नाही :

परंतु, बीजकातील वस्तू गठ्यांमध्ये किंवा हप्त्याने प्राप्त झाल्या असतील तर, नोंदणीकृत व्यक्ती शेवटचा गठ्ठा किंवा हप्ता प्राप्त झाल्यावर कर जमा करण्यास हक्कदार असेल :

परंतु आणखी असे की, ज्यांच्या पुरवठ्यावर प्रत्यावर्ती आकार तत्त्वावर कर देय असेल त्यांव्यतिरिक्त अन्य वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठादारास पुरवठा मूल्याची रक्कम तसेच त्यावरील देय असलेला कर पुरवठादाराने बीजक दिल्याच्या दिनांकापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत प्राप्तकर्ता प्रदान करण्यात कसूर करील त्याबाबतीत, प्राप्तकर्त्याने घेतलेली निविष्टी कराच्या जमा रकमेइतकी रक्कम, त्याच्या उद्विष्टी कर दायित्वामध्ये त्यावरील व्याजासह विहित करण्यात येईल अशा रीतीने जमा करण्यात येईल :

परंतु तसेच, प्राप्तकर्त्याने वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठा मूल्याच्या रकमेचे त्यावरील देय असलेल्या व्याजासह प्रदान केल्यावर, तो निविष्टी कराची जमा रक्कम मिळण्यास हक्कदार असेल.

(३) व (४) ** ** **

जमा रक्कम व रोखलेली जमा रक्कम यांचे संविभाजन.

**१७.** (१) व (२) ** ** **

(३) पोट-कलम (२) खालील करमाफ पुरवठ्याचे पुरवठा मूल्य हे, विहित केल्याप्रमाणे असेल आणि त्यात ज्यावर प्राप्तकर्ता प्रत्यावर्ती आकार तत्त्वावर कर भरण्यास पात्र असेल, असा पुरवठा रोख्यांवरील व्यवहार, जमिनीची विक्री आणि अनुसूची दोन मधील ५ व्या परिच्छेदातील खंड (ख) च्या अधीन राहून, इमारतीची विक्री यांचा अंतर्भाव असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ “करमाफ पुरवठ्याचे मूल्य” या शब्दप्रयोगात, अनुसूची तीनच्या ५ व्या परिच्छेदात विनिर्दिष्ट केलेले असतील ते व्यवहार खेरीज करून, त्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर व्यवहारांच्या किंवा संव्यवहारांच्या मूल्याचा समावेश होणार नाही.

(४) ते (६) ** ** **

**१८.** ते **२२.** ** ** **

नोंदणीसाठी पात्र नसणाऱ्या व्यक्ती.

**२३.** (१) ** ** **

(२) शासन, परिषदेच्या शिफारशींवरून, या अधिनियमान्वये, ज्या व्यक्तींना नोंदणी करण्यामधून सूट देता येईल असा व्यक्तींचा प्रवर्ग अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील.

**२४.** ते **२९.** ** ** **

नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेणे.

**३०.** (१) विहित करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून, समुचित अधिकाऱ्याने स्वतःहून ज्याची नोंदणी रद्द केली असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीला त्याची नोंदणी रद्द केल्याचा आदेश बजाविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित रीतीने नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेण्यात यावा याकरिता अशा अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

परंतु, असा कालावधी, पुरेसे कारण दर्शविल्यावर, आणि लेखी कारणे नोंदवून,—

(क) राज्य कर अपर आयुक्ताद्वारे, किंवा यथास्थिति, राज्य कर सह आयुक्ताद्वारे तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी,

(ख) राज्य कर आयुक्ताद्वारे, खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधी पलीकडे, तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा आणखी कालावधीसाठी, वाढविता येईल.

(२) व (३) ** ** **

**३१.** ते **५३.** ** ** **

कराचा परतावा.

**५४.** (१) ते (५) ** ** **

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, समुचित अधिकाऱ्यास, परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या प्रवर्गाव्यतिरिक्त नोंदणीकृत व्यक्तींनी केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरवठ्यामुळे परताव्याचा कोणताही दावा केलेला

असल्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्ती, मर्यादा व संरक्षक उपाययोजना यांना अधीन राहून, तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आलेली निविष्टी कराची जमा रक्कम वगळून, अशा प्रकारे दावा केलेल्या एकूण रकमेच्या नव्वद टक्के इतक्या रकमेचा तात्पुरत्या स्वरूपात परतावा देता येईल आणि त्यानंतर अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची यथोचित पडताळणी केल्यावर, दावा केलेला परतावा अंतिमतः चुकता करण्यासाठी पोट-कलम (५) अन्वये आदेश देता येईल.

(७) ते (१४) ** ** **

**५५.** ** ** **

विलंबाने केलेल्या परताव्यांवर व्याज.

**५६.** जर कोणत्याही अर्जदाराला कलम ५४ च्या पोट-कलम (५) अन्वये कराचा परतावा देण्याचा आदेश दिला असेल, त्याचा परतावा, त्या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दिलेला नसेल तर, उक्त पोट-कलमान्वये अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या दिनांकापासून अशा कराच्या परताव्याच्या दिनांकापर्यंत, अशा परताव्याच्या संबंधात, परिषदेच्या शिफारशींवरून शासनाने काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे सहा टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही अशा दराने व्याज देय असेल :

परंतु असे की, जेथे अभिनिर्णय प्राधिकारी किंवा अपील प्राधिकारी किंवा अपील न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांनी दिलेल्या व ज्यास अंतिम स्वरूप प्राप्त झाले आहे अशा आदेशाने उद्भवलेला परताव्याचा कोणताही दावा आणि अशा आदेशाच्या परिणामी दाखल केलेला अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनाकांपासून साठ दिवसांच्या आत परतावा दिलेला नसेल तर, परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित करण्यात येईल, त्याप्रमाणे नऊ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा दराने अशा परताव्याच्या संबंधात अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या दिनांकापासून परताव्याच्या दिनांकापर्यंत व्याज देय असेल.

**स्पष्टीकरण.—** कलम ५४ च्या पोट-कलम (५) अन्वये, समुचित अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याने, न्यायाधिकरणाने किंवा कोणत्याही न्यायालयाने परताव्याचा कोणताही आदेश दिला असेल त्याबाबतीत, या कलमाच्या प्रयोजनार्थ, अपील प्राधिकाऱ्याने, न्यायाधिकरणाने किंवा न्यायालयाने दिलेला आदेश हा, उक्त पोट-कलम (५) अन्वये दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**५७.** ते **६१.** ** ** **

विवरण दाखल न करणाऱ्या व्यक्तीचे निर्धारण.

**६२.** (१) ** ** **

(२) नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (१) खालील निर्धारण आदेश बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत वैध विवरण दाखल करील त्याबाबतीत, उक्त निर्धारण आदेश, मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. परंतु, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये व्याज भरण्याच्या किंवा कलम ४७ अन्वये विलंब फी भरण्याच्या दायित्वातून त्याची मुक्तता होणार नाही.

**६३.** ते **१०८.** ** ** **

अपील न्यायाधिकरण आणि त्याची न्यायपीठे.

**१०९.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीन राहून, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये घटित केलेले वस्तू व सेवा कर न्यायाधिकरण हे, या अधिनियमान्वये अपील प्राधिकाऱ्याने किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशावरील अपीलांची सुनावणी करणारे अपील न्यायाधिकरण असेल.

(२) राज्यात स्थित असलेल्या राज्य न्यायपीठाची आणि क्षेत्रीय न्यायपीठांची रचना आणि अधिकारिता केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०९ च्या तरतुदीनुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या या नियमांनुसार करण्यात येईल.

**११०.** राज्य न्यायपीठ आणि क्षेत्रीय न्यायपीठांचे अध्यक्ष आणि सदस्य यांची अर्हता, नेमणूक, वेतन व भत्ते, पदावधी, राजीनामा, पदावरून दूर करणे, हे केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ११० च्या तरतुदीनुसार करण्यात यईल. अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची आणि सदस्यांची अर्हता, नेमणूक, त्यांच्या सेवेच्या शर्ती, इत्यादी.

**१११.** ते **११३.** ** ** **

**११४.** राज्य अध्यक्ष, राज्यातील अपील न्यायाधिकरणाच्या राज्य न्यायपीठासाठी आणि क्षेत्रिय न्यायपीठांसाठी निहित करण्यात येतील अशा, वित्तीय आणि प्रशासकीय अधिकारांचा वापर करील : राज्य अध्यक्षाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार.

परंतु, राज्य अध्यक्षास त्याला योग्य वाटतील असे त्याचे कोणतेही वित्तीय व प्रशासकीय अधिकार राज्य न्यायपीठाच्या किंवा क्षेत्रीय न्यायपीठाच्या इतर कोणत्याही सदस्याकडे किंवा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविण्याचा प्राधिकार असेल. मात्र, असा सदस्य किंवा अधिकारी, अशा सोपविलेल्या अधिकारांचा वापर करताना, राज्य अध्यक्षाचे निदेश, नियंत्रण आणि पर्यवेक्षण याखाली काम करील, अशी त्याकरिता अट राहील.

**११५.** व **११६.** ** ** **

**११७.** (१) अपील न्यायाधिकरणाच्या राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल आणि उच्च न्यायालयास, जर त्या प्रकरणात विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत असल्याबाबत त्याची खात्री पटली असेल तर, असे अपील दाखल करून घेता येईल. उच्च न्यायालयाकडे अपील करणे.

(२) उच्च न्यायालयास, ज्या प्रश्नावर,—

(क) राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी निर्णय देण्यात आलेला नसेल; किंवा

(ख) पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा विधिविषयक प्रश्नावरील निर्णयाच्या कारणाने, राज्य न्यायपीठाकडून किंवा क्षेत्रीय न्यायपीठांकडून चुकीने निर्णय देण्यात आलेला असेल, अशा कोणत्याही प्रश्नावर निर्णय येईल.

**११८.** (१) (क) अपील न्यायाधिकरणाच्या राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी दिलेल्या कोणत्याही आदेशावर; किंवा सर्वोच्च न्यायालयात अपील करणे.

(ख) ज्या प्रकरणात कलम ११७ खाली केलेल्या अपिलात उच्च न्यायालयाने न्यायनिर्णय किंवा आदेश दिला असेल अशा कोणत्याही प्रकरणात, न्यायनिर्णय किंवा आदेश दिल्याच्या लगतनंतर उच्च न्यायालयाने स्वतःहून किंवा व्यथित झालेल्या पक्षकाराने किंवा त्याच्यावतीने केलेल्या अर्जावरून, ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी योग्य असल्याचे प्रमाणित केल्यावर, सर्वोच्च न्यायालयास उच्च न्यायालयाच्या अशा कोणत्याही न्यायनिर्णयावर किंवा आदेशावर, सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल.

(२) व (३) ** ** **

**११९.** उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आलेले असले तरी, कलम ११३ च्या पोट-कलम (१) अन्वये अपील न्यायाधिकरणाच्या राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी दिलेल्या आदेशाच्या किंवा कलम ११३ च्या पोट-कलम (१) अन्वये अपील न्यायाधिकरणाच्या राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी दिलेल्या आदेशाच्या किंवा यथास्थिति, कलम ११७ अन्वये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या परिणामी, शासनाला देय असलेल्या रकमा ह्या अशाप्रकारे दिलेल्या आदेशानुसार प्रदेय असतील. अपील, इत्यादी दाखल केलेले असले तरी, चुकत्या करावयाच्या रकमा देय असणे.

**१२०.** ते **१३१.** ** ** **

विवक्षित अपराधांसाठी शिक्षा.

**१३२.** (१) जी कोणतीही व्यक्ती, पुढीलपैकी कोणतेही अपराध करील, किंवा करण्याची व्यवस्था करील आणि त्यातून उद्‌भवणारे लाभ ठेवून घेईल,—

(क) ते (च) ** ** **

(छ) कोणत्याही अधिकाऱ्यास या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यास अडथळा निर्माण करील किंवा त्याला अटकाव करील ;

(ज) व (झ) ** ** **

(ञ) कोणत्याही महत्त्वाच्या पुराव्यात किंवा दस्ताऐवजीत फेरफार करील किंवा तो नष्ट करील ;

(ट) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये जी कोणतीही माहिती देणे आवश्यक असेल अशी कोणतीही माहिती देण्यात कसूर करील किंवा (त्याने दिलेली माहिती ही खरीखुरी माहिती आहे असे शाबीत करण्याचा भार त्याच्यावर आहे, हे माहीत असताना वाजवी कारणाशिवाय) खोटी माहिती सादर करील; किंवा

(ठ) या कलमाच्या खंड (क) ते (ट) मध्ये नमूद केलेला कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तशी कृती करण्यास अपप्रेरणा देईल,

तर, ती व्यक्ती पुढील शिक्षेस पात्र असेल ;

(एक) चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेली परताव्याची रक्कम, रुपये पाचशे लाखांहून अधिक असेल अशा प्रकरणांत तिला पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा;

(दोन) चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली परताव्याची रक्कम, दोनशे लाखांहून अधिक परंतु पाचशे लाखांहून अधिक नसेल अशा प्रकरणांत, तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा ;

(तीन) चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेल्या परताव्याची रक्कम शंभर लाख रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु दोनशे लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा प्रकरणांत, एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा;

(चार) जर ती खंड (च) किंवा खंड (छ) किंवा खंड (ञ) मध्ये नमूद केलेला कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तशी कृती करण्यास अपप्रेरणा देईल, तर, ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) ते (६) ** ** **

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ कर या संज्ञेत, हा अधिनियम, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम यांच्या तरतुदींन्वये चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेला परतावा आणि वस्तू व सेवा कर (राज्यांना नुकसानभरपाई देणे) अधिनियमांन्वये आकारलेला उपकर याचा अंतर्भाव असेल.

**१३३.** व **१३७.** ** ** **

**१३८.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल एकतर खटला सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू झाल्यानंतर, अपराधांसंबंधात आरोपी असलेल्या व्यक्तीने विहित करण्यात येईल अशा रीतीने अशी आपसमेळाची रक्कम केंद्र सरकारला किंवा यथास्थिति, राज्य शासनाला प्रदान केल्यावर आयुक्तांकडून अपराध आपसात मिटविण्यात येईल : अपराध आपसात मिटवणे.

परंतु, या कलमात अंतर्भूत असणारी कोणतीही गोष्ट पुढील बाबतीत लागू होणार नाही :—

(क) कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) ते (च) खाली विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत ज्या व्यक्तीस अपराध आपसात मिटविण्यासाठी एकदा परवानगी देण्यात आली आहे आणि उक्त पोट-कलमाच्या खंड (क) ते (च) खाली विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाशी संबंधित असणारे खंड (ठ) खाली वर्णन केलेले अपराध ;

(ख) या अधिनियमान्वये किंवा एखाद्या राज्य वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर किंवा एकात्मिक वस्तू सेवा कर अधिनियमाच्या बाबतीत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक मुल्याचा पुरवठा करण्यासंबंधातील, कोणताही अपराध खंड (क) मधील अपराधाखेरीज अन्य एकदा आपसात मिटविण्यासाठी ज्या व्यक्तीस परवानगी देण्यात आली आहे अशी व्यक्ती;

(ग) या अधिनियमाखालील अपराध तसेच तोच अपराध त्या त्यावेळी अंमलात असणाऱ्या इतर कायद्यांखाली देखील केल्याचा आरोप ज्या व्यक्तीवर ठेवण्यात आला आहे अशी व्यक्ती ;

(घ) न्यायालयाकडून या अधिनियमाखालील अपराधाकरिता जिला सिद्धापराधी ठरविले आहे अशी कोणतीही व्यक्ती ;

(ङ) कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (छ) किंवा खंड (ञ) किंवा खंड (ट) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध केल्याचा आरोप ज्या व्यक्तीवर ठेवण्यात आला आहे अशी व्यक्ती; आणि

(च) विहित करण्यात येईल अशा व्यक्तींचा किंवा अपराधांचा इतर कोणताही प्रवर्ग :

परंतु आणखी असे की, या कलमातील तरतुदींन्वये ज्यासाठी परवानगी दिलेली आहे असा कोणताही आपसमेळ यामुळे, इतर कोणत्याही कायद्यान्वये सुरू केलेल्या कार्यवाहीस कोणतीही असल्यास बाधा पोहोचणार नाही :

परंतु तसेच, अशा अपराधात अंतर्भूत असणारा कर, व्याज व शास्ती यांचे प्रदान करण्यात आल्यानंतरच केवळ, आपसमेळ करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

(२) या कलमाखालील अपराधाची आपसमेळ रक्कम ही, दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल किंवा अंतर्भूत कराच्या पन्नास टक्के, यांपैकी जी अधिक असेल ती, या किमान रकमेच्या आणि तीस हजारांपेक्षा कमी नसेल किंवा कराच्या दीडशे टक्के, यापैकी जी अधिक असेल त्या कमाल रकमेस अधीन राहून, विहित करण्यात येईल, त्याप्रमाणे असेल.

(३) ** ** **

**१३९.** व **१७४.** ** ** **

**अनुसूची एक.** ** ** **

**अनुसूची दोन.** ** ** **

## अनुसूची तीन

[कलम ७ पहा ]

### वस्तुंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा ठरणार नाहीत असे व्यवहार किंवा संव्यवहार

**१.** ते **६.** ** ** **

**७.** भारतामध्ये वस्तू न आणता, भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारताबाहेरील दुसऱ्या ठिकाणी होणारा वस्तुंचा पुरवठा.

**८.** (क) अंतर्देशीय वापराकरिता वटवणी देण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला वखारीतील वस्तुंचा केला जाणारा पुरवठा ;

(ख) भारताबाहेर स्थित असलेल्या मूळ बंदराहून वस्तुंची पाठवणी करण्यात आल्यानंतर परंतु, अंतर्देशीय वापराकरिता वटवणी करण्यापूर्वी, वस्तुंच्या मालकी हक्कांसंबंधीच्या दस्तऐवजाचे पृष्ठांकन करून त्याद्वारे, मालप्रेषितीकडून इतर कोणत्याही व्यक्तीला होणारा वस्तुंचा पुरवठा.

**स्पष्टीकरण १.—** परिच्छेद २च्या प्रयोजनार्थ "न्यायालय" या संज्ञेमध्ये, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण २.—** परिच्छेद ८ च्या प्रयोजनांसाठी, "वखारीतील वस्तू" या शब्दप्रयोगास, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ मध्ये जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४. ]**

**[ महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री. **]**

**[विधानसभेने दिनांक २० जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.